दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २१७ | MAHMAR/2006/17212 | रायगड | सोमवार, दि.३ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

### शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज समाधी मंदिराचे उद्घाटन व भक्तनिवासाचे लोकार्पण

# संतांचे विचार आणि वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी आहे : उपमुख्यमंत्री

**पंढरपूर । वृत्तसंस्था**

वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा आहे. आषाढी आणि कार्तिकी वारीत येणारा वारकरी हा आमचा प्रथम व्हीआयपी आहे. संतांचे विचार आणि वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगा-वले, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, माजी मंत्री तथा आमदार तानाजी सावंत, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, संस्था प्रमुख दादा महाराज मोरे माऊली, स्वामी अमृता आश्रम महाराज, चकोर महास्वामी बाविस्कर, ह.भ.प. अक्षय भोसले महाराज, सरपंच सौ. जयलक्ष्मी माने व मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.



शासनाने मंदिरांच्या जतन व संवर्धनासाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, आषाढी दिंडी अनुदान, विमा योजना यांसारख्या अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे ज्याने गाईला गोमातेचा दर्जा दिला आहे. हे राज्य संतांची, वीरांची, शेतकऱ्यांची आणि कष्टकऱ्यांची भूमी आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले. तसेच श्री संत मोरे परिवाराच्या वारकरी परंपरेच्या कार्याचे कौतुक केले.


यावेळी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, हे सरकार शेतकरी आणि वारकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. संकटात असलेल्या जनतेच्या मदतीला तत्परतेने धावून जाण्याची आमची भूमिका आहे. प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते श्री संत मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्घाटन तर भक्तनिवास क्र. १ चे लोकार्पण रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते झाले. या उद्घाटन सोहळ्यामुळे शेगाव दुमाला गावात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले असून, वारकरी संप्रदायासाठी हे एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे.

# मच्छिमारांची होणार जनगणना ; ३ नोव्हेंबरपासून गणनेला सुरुवात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

देशातील सागरी मत्स्य व्यवसायाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून ५वी राष्ट्रीय सागरी मासेमारी गणना २०२५ हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. ही गणना ३ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर, मुंबई उपनगर या महाराष्ट्रातील ७ सागरी जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण होणार आहे. येथे सागरी मत्स्य व्यवसायाशी संबंधित घरांची, नौकांची आणि सुविधांची तपशीलवार माहिती संकलित केली जाणार आहे. देशातील सर्व किनारपट्टी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये गणना होणार आहे. दरम्यान, यंदा मोबाइल पच्या माध्यमातून जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आधुनिक पद्धतीमुळे माहिती संकलन अधिक वेगात आणि पारदर्शक होईल, असा दावा करण्यात आला आहे.

सागरी मच्छीमारांची जनगणना दर पाच वर्षांनी करण्यात येते. पारंपरिक पद्धतीने म्हणजे कागदोपत्री माहिती भरून ती कार्यालयात पाठवण्याऐवजी यंदा थेट पवर माहिती संकलीत करण्यात येणार आहे. ही जणगणना ३ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत करण्यात येणार आहे. या गणनेसाठी - हे प विकसित करण्यात आले आहे. 'सेंटर मरिन फिशरीज रिसर्च इन्स्टिट्यूट'ने (एमएफआरआय) मोबाइल आणि टॅबवर आधारित या पची निर्मिती केली आहे. या पमुळे मासेमारी केंद्रे, बंदरांची माहिती, मासेमारी केली जाणारी गावे यांची माहिती पडताळण्यास मदत होणार आहे. पचे पर्यवेक्षणाच्या कामाची जबाबदारी सीएमएफआरआय, भारतीय मासेमारी सर्वेक्षण विभाग आणि किनारी राज्यातील मत्स्यव्यवसाय



विभागातील कर्माचाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

ही जनगणना डिजीटल पद्धतीने केली जाणार असून, सुमारे ३ हजार ५०० सागरी मच्छीमार गावे आणि १२ लाख कुटुंबाचा त्यात समावेश करण्यात येणार आहे. जनगणनेचा मुख्य उद्देश मच्छीमारांची लोकसंख्या, सामाजिक-आर्थिक स्थिती, मासेमारीसाठी वापरली जाणारी साधने, मासेमारीशी संबंधित पायाभूत सुविधांचे दस्तऐवजीकरण करणे आवश्यक आहे. ही जनगणना ३ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सुमारे ५२६ सागरी मच्छीमार गावे आहेत. सागरी मच्छीमार गावांच्या संख्येनुसार देशात महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे.

### मुंबईतील रोहित आर्या एन्काऊंटर प्रकरणात मोठी अपडेट

# पोलिसांसह शिक्षण विभागातील अधिकारीही अडचणीत ?

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई शहरातील पवई इथं एका स्टुडिओत १७ मुलांना ओलीस ठेवणाऱ्या रोहित आर्याचा पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झाला. सहायक निरीक्षक अमोल वाघमारे यांनी रोहितवर गोळी झाडली, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. या घटनेची आता न्यायालयीन चौकशी होणार असून, गुन्हे शाखेसमोर चकमकीचे पुरावे गोळा करण्याचं मोठं आव्हान असणार आहे. रोहितने राज्य सरकारच्या शिक्षण विभागावर फसवणुकीचा आरोप केला होता, त्यामुळे या प्रकरणाचीही चौकशी होण्याची शक्यता आहे.



पवईच्या महावीर क्लासिक इमारतीमधील आर. ए. स्टुडिओमध्ये रोहित आर्या याने १७ मुलांसह एकूण २० लोकांना ओलीस ठेवले होते. यावेळी मुलांना सोडवण्यासाठी स्टुडिओत शिरलेल्या सहायक निरीक्षक अमोल वाघमारे यांनी रोहितवर गोळी झाडली. छातीत गोळी लागल्याने रोहितचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी अपमृत्यूची नोंद करण्यात आली असून, तपास गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे.

दरम्यान, आता या घटनेची न्यायालयीन चौकशी होणार असल्याने गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांसमोर अनेक प्रश्न आहेत. रोहितवर गोळी झाडण्याची वेळ का आली? छातीऐवजी इतरत्र गोळी झाडून त्याला रोखता आले असते का? क्यूआरटीला बोलावले असताना मुंबई पोलिस आत का शिरले? यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचं मोठं आव्हान गुन्हे शाखेसमोर आहे. त्यामुळे गुन्हे शाखेचे पथक वारंवार घटनास्थळाची पाहणी करत आहे आणि बारीकसारीक तपशील गोळा करत आहे. घटनास्थळी उपस्थित साक्षीदार आणि पोलिस अधिकाऱ्यांचे जबाब नोंदवले जात आहेत.

रोहित आर्या हा शिक्षण विभागाच्या 'माझी शाळा, स्वच्छ शाळा' आणि 'मुख्यमंत्री माझी शाळा' या उपक्रमांशी जोडला गेला होता. रोहितचा आरोप होता की, या दोन्ही उपक्रमासाठी सरकारने मी दिलेली संकल्पना वापरली. मात्र त्याचे श्रेय आणि पूर्ण पैसे दिले नाहीत. या आरोपात किती तथ्य आहे, हे तपासण्यासाठी शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांची चौकशी होण्याची शक्यता आहे. तसंच, शिक्षण विभागाकडून रोहितला काही पैसे येणे होते का, हे तपासण्यासाठी रोहितच्या बँक खात्याचीही झाडाझडती घेतली जाणार आहे. गेल्या पाच दिवसांत काही सिने कलाकारांनी स्टुडिओला भेट दिली होती, त्यांनाही गरज पडल्यास चौकशीसाठी बोलावले जाईल, असं एका अधिकाऱ्याकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

# पोलीस असल्याची बतावणी, चैन आणि अंगठी घेऊन दोघे पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस असल्याची बतावणी करत ८० वर्षीय इसमाकडील सोन्याची चैन आणि अंगठी घेऊन दोघेजण मोटरसायकल वरून पसार झाले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गोविंदं प्रभाकरन हे सेक्टर २० खारघर येथे राहत असून ते ग्रामविकास भवन, खारघर जवळील भाजीपाल्याच्या बाज-ारातून भाजी घेऊन घरी रेन ट्री मार्गाने पायी चालत जात होते. त्यावेळी एक इसम त्यांचे समोर आला आणि सीआयडी पोलीस असल्याचे सांगितले अमली पदार्थांची तपासणी करत असून पिशवी चेक करायचे आहे असे सांगितले आणि पिशवी चेक केल्यानंतर सोन्याची चैन आणि अंगठी हे सोने घालून फिरता असे सांगून ते चेक करायचे आहे असे सांगितले. त्यांनी अंगठी व चैन काढली आणि त्याने ती त्याच्याजवळ ठेवली. त्यानंतर दुसरा इसमाच्या गाडीवर बसून ते ३१ ग्राम वजनाचे सोन्याची चैन, अंगठी घेऊन पळून गेले.

# काँग्रेसमध्ये सन्मानाने राहा : महेंद्रशेठ घरत

### रायगड जिल्हा काँग्रेसच्या आढावा बैठकीत कार्यकर्त्यांना सन्मान आणि एकजुटीचा संदेश



**दै.रायगड नगरी । उरण**

राजकारणात सध्या कुणाचा पायपोस कुणाला नाही, भाजपमध्ये आमदारालाही बोलता येत नाही, त्यांची चिडीचूप अशी अवस्था आहे. मात्र काँग्रेसमध्ये सन्मान आहे, प्रत्येक कार्यकर्त्याला आपल्या भावना व्यक्त करण्याची मुभा आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनो, काँग्रेसमध्ये स्वाभिमानाने आणि सन्मानाने राहा, असे प्रतिपादन काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष व आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी शेलघर येथे केले.शनिवारी (ता. १) शेलघर येथील दिवंगत जोमा नारायण घरत समाज मंदिरात रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली होती.

यावेळी निवडणूक प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करताना महेंद्रशेठ घरत म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इच्छुकांनी अर्ज भरावेत. सर्व अर्जांची छाननी करूनच उमेदवारी जाहीर केली जाईल. त्यांनी पक्षातील शिस्त, निष्ठा आणि कार्यकर्त्यांचा सन्मान या तीन घटकांवर विशेष भर दिला.

यावेळी रायगड जिल्हा प्रभारी राणी अग्रवाल कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, काँग्रेसच्या सध्याच्या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांना ताकद मिळाली आहे. तालुका अध्यक्ष हे संघटनाचे केंद्रस्थान आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत उमेदवार सक्षम, जनाधार असलेला आणि समाजाशी नाते जपण-ारा हवा. परिस्थितीनुसार काँग्रेस स्वबळावरही लढण्यास तयार आहे. काँग्रेस हा एक परिवार आहे आणि प्रत्येक सदस्य त्याचा अविभाज्य भाग आहे.

यावेळी उरण तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे यांनी भाजपवर थेट टीका करत म्हटले, भाजपमुळेच महागाईचा भस्मासुर वाढलाय. सामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत काँग्रेसशिवाय पर्याय नाही, अशा भावना जनतेत आहेत.

या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी मतदार याद्यांतील घोळ, निवडणुकीची तयारी आणि उमेदवारीबाबत आपली मते मांडली. तिकीट मिळो वा न मिळो, पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करत राहू, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. कार्यकर्त्यांमध्ये आगामी निवडणुकांबद्दल उत्साह आणि चैतन्य जाणवत होते.

या बैठकीला रायगड जिल्हा प्रभारी राणी अग्रवाल, प्रदीप राव (प्रभारी अलिबाग विधानसभा), डॉमिनिक डिमेलो (प्रभारी उरण विधानसभा), मनोज कांबळे (प्रभारी पेण विधानसभा), अशोक मोरे (प्रभारी श्रीवर्धन विधानसभा), सुरेश काटकर (प्रभारी महाड विधानसभा), सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, ऍड.श्रद्धा ठाकूर, डॉ. मनीष पाटील, महिला जिल्हाध्यक्ष रेखा घरत, नंदराज मुंगाजी, महाराष्ट्र फिशरमॅन अध्यक्ष मार्तंड नाखवा, रायगड जिल्हा काँग्रेस अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अखलाक सिलोत्री, निखिल ढवळे व तालुका अध्यक्ष, तसेच रायगड जिल्ह्यातील विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये आठवडाभरात दुसरी महिला आत्महत्या

### फॉरेक्स गुंतवणुकीच्या आमिषाने कुटुंबाची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये नावडे येथील हुंडाबळीमुळे विवाहितेच्या आत्महत्येने परिसरात हळहळ व्यक्त होत असतानाच, दोन दिवसांपूर्वीच पनवेल शहरात आणखी एका महिलेच्या आत्महत्येची नोंद पोलीस ठाण्यात झाल्याने शहर हादरून गेलं आहे. फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून तब्बल ५.३० कोटी रूपयांची फसवणूक झाल्यामुळे आणि त्यातून झालेल्या मानसिक छळामुळे ३६ वर्षीय विवाहित महिलेनं आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले.

या घटनेमुळे ऑनलाईन गुंतवणुकीतील फसवणुकीमुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक व मानसिक ताणाचा आणि महिला सुरक्षेच्या प्रश्नाचा पुन्हा एकदा पुनरुच्चार झाला आहे.पनवेल शहरातील बालाजी आंगण या इमारतीच्या ११ व्या मजल्यावर राहणाऱ्या ३६ वर्षीय महिलेने ८ ऑक्टोबर रोजी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्या दिवशी त्यांचा पती बाहेरगावी होता.

सकाळी मुलांना शाळेत पाठवल्यानंतर त्यांनी पतीला 'मुलांसाठी जेवण तयार केले' असा फोटो पतीला पाठवला होता. मात्र त्यानंतर फोन न उचलल्याने नातेवाईकांना संशय आला. दुपारी तीनच्या सुमारास शाळेतून परतलेल्या मुलांना आईने आत्महत्या केल्याचं आढळलं.सर्वांसोबत हसत खेळत असणा-या पिडीतेने आत्महत्येचा मार्ग का निवडला या प्रश्नाने तीच्या कुटूंबाला हादरून सोडले होते. सुरुवातीला ही घटना मानसिक तणावामुळे आत्महत्या केल्याचा समज होता. मात्र कोणामुळे हा मानसिक ताण होता हे अस्पष्ट होते. परंतु नंतर मृत महिलेने काही दिवसांपूर्वी नातेवाईकांकडून उसने पैसे मागितल्याची माहिती लक्षात आल्यानंतर तिच्या कुटुंबीयांना संशय आला. त्यानंतर पिडीतेच्या बँक खात्याची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणावर संशयास्पद व्यवहार आढळले. अखेर मृत महिलेचे ६५ वर्षीय वडिलांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीनुसार, गुजरातमधील सुरेंद्रनगर येथील रवी हरेशभाई भडका या व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र आत्महत्या प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भडका याने २०२३ पासून फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवत फिर्यादीच्या कुटुंबाचा विश्वास संपादन केला. सुरुवातीला काही रकमेचा परतावा देऊन विश्वास संपादन केल्यानंतर त्याने तब्बल ५.३० कोटींची रक्कम गुंतवणुकीच्या नावाखाली घेतली. मात्र, गेल्या वर्षभरात कोणताही परतावा न देता उलट पिडीतेवर पैशांसाठी दबाव आणत मानसिक त्रास दिला. या सततच्या छळाला कंटाळूनच ३६ वर्षीय पिडितेने आत्महत्या केली, असे तक्रारीत नमूद आहे.या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, सहाय्यक निरीक्षक प्रविण फडतरे हे करीत आहेत.

पनवेल शहरात आठवड्याभरात दोन महिला आणि एका तरूण विद्यार्थीनीच्या आत्महत्यांनी खळबळ उडाली आहे. महिला सुरक्षेसोबतच आर्थिक फसवणूक आणि मानसिक आरोग्याच्या आधारव्यवस्थेबाबत अधिक ठोस उपाययोजनांची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# मुलांच्या ताटातले पोषण हरवले

नुकतीच माझी बदली झाली. नवीन शाळेत रुजू झालो. दुपारच्या सुट्टीत मुलं जेवायला बसली की, मुलांनी डब्यात काय आणलं आहे, हे मी पाहत असतो. सुमारे १५ ते २० टक्के मुलं शाळेत येताना डब्यात चपाती भाकरीसोबत पापडाची, शेंगदाण्याची, लसणाची किंवा खुरसण्याची चटणी दिसली. शारीरिक वाढ आणि विकासाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर उभ्या चिमुकल्या मुलांचा आहार हा असा? 'मुलांच्या डब्यात फक्त चटणी देऊ नका', असं पालकांना सांगायला सुरुवात केली. पालकांनी या भूमिकेचं स्वागत केलं; मात्र, 'पोरं भाजी-भाकरी/चपातीला तोंडच लावत नाहीत', अशी लाडीक तक्रार आई करू लागल्या. हल्ली जेवणाच्या बाबतीत पोरांचे इतके नखरे असतात की 'आज कोणती भाजी करु आणि कोणती नको', हा प्रश्न आईना रोज छळतो. त्यांनी मुलांसमोर जणू हात टेकले आहेत.


पाव, बटर, बिस्कीट, मॅगी, चिप्स, कुरकुरे, चॉकलेट्स, कॅडबरी, फास्ट फूड आणि जंक फूड, हेच मुलांच्या आवडीचे अन्न झाले आहे. जेवताना मोबाइल किंवा टीव्ही असा कुठला तरी स्क्रीन समोर हवा असतो! गेल्या काही वर्षात मुलांच्या जीवनशैलीत आणि खाद्यसंस्कृतीत झपाट्याने बदल झाला. भाजीपाला, कडधान्ये अशा पोषणमूल्य असलेल्या पारंपरिक आहाराऐवजी झटपट, चटकदार आणि आकर्षक पॅकबंद पदार्थांना प्राधान्य आले. भविष्यात हा वेग अधिक वाढेल. भाजी-भाकरी, डाळ-भाताचा हिस्सा कमी होत जाईल. डिजिटल सवयींमुळे मुले निष्क्रिय बनतील, शारीरिक हालचाल कमी होईल. आहारापेक्षा चव व सोय महत्त्वाची ठरेल. परिणाम? कुपोषण आणि स्थूलपणा दोन्ही वाढतील, प्रतिकारशक्ती कमी होईल, चिडचिड आणि आळस वाढेल. बालवयातच हृदयरोग, मधुमेह आणि रक्तदाबाचे धोके निर्माण होतील, अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे कठीण होईल. हल्ली रात्री आठ-नऊ वाजता जेवलेली मुले सकाळी केवळ चहा पिऊन शाळेत येतात. थेट दुपारी एक-दीड वाजता जेवणाच्या सुट्टीत जेवतात. परिपाठात राष्ट्रगीत अथवा राज्यगीत सुरू असताना, मुली चक्कर येऊन कोसळताना मी बघतो. बारा-पंधरा तास उपाशी राहिल्यावर दुसरे काय होणार? डोके दुखणे, कार्यक्षमता कमी होणे, शिकण्याकडे लक्ष केंद्रित न होणे, शिकवलेले आत्मसात न होणे! या गंभीर समस्येबाबत पालक अनभिज्ञ तरी आहेत किंवा हतबल तरी। मुलांचा आहार संतुलित आणि पौष्टिक हवा. चींलरळ चरळप फळे, भाज्या, धान्ये, प्रथिने आणि दुग्धजन्य पदार्थांचा समावेश असला पाहिजे. आवश्यक तेवढे मीठ आणि साखर यांचाही समतोल असावा. मुलांच्या वयानुसार, शारीरिक हालचालींनुसार पोषक तत्त्वांची गरज ठरते. आहारात त्यानुसार बदल करणे आवश्यक असते. विज्ञान विषयात मुले प्रथिने, पिष्टमय पदार्थ, स्निग्ध घटक, क्षार आणि जीवनसत्त्वांविषयी शिकतात. मात्र, ते केवळ पाठांतर आणि परीक्षेसाठी असते. जीवनात त्याचे उपयोजन होताना दिसत नाही. आहाराबाबत पालक आणि मुले दोघेही कमालीचे बेफिकीर असताना शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची. वैद्यक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, मुलांना दररोज साधारण सव्वा लीटर द्रवपदार्थाची आवश्यकता असते. उष्ण वातावरणात ही गरज आणखी वाढते. पाणी हे सर्वोत्तम पेय. परंतु दुर्दैवाने गेल्या काही वर्षात सॉफ्ट ड्रिंक्स, फ्लेवर्ड दूध, फळांचे रस, स्पोर्ट्स ड्रिंक्स आणि एनर्जी ड्रिंक्स यांचा अतिरेक वाढला आहे. शाळा सुटल्यानंतर मुलांची पावले दुकानांच्या दिशेने झपझप पडू लागतात. बर्फाची 'पेप्सी कांडी', कुरकुरे, वेफर्स, रिंग्ज, बिस्किट, चॉकलेट्स असे खाद्य पदार्थ घ्यायला गर्दी उसळते. फास्ट फूडच्या चवीमुळे मुलांना भाज्यांच्या चवी आवडेनाशा झाल्या आहेत. पाकीटबंद मसाल्यांच्या चवी मुलांना व्यसन लावतात. मुले हट्ट करून रडून रडून त्याचीच मागणी करतात. 'खेड्यातून शहरात शिकायला येणारी बहुतेक मुले कुपोषित दिसतात', असे निरीक्षण लेखक आणि खाद्य संस्कृतीचे अभ्यासक शाहू पाटोळे नोंदवतात, त्यामागचे कारण तेच! एकीकडे कुपोषण, तर दुसरीकडे अति खाणे असे दुहेरी संकट या पिढीसमोर उभे आहे. शाळा, पालक आणि समाज यांनी मिळून 'आहार साक्षरता' निर्माण केली नाही, तर भावी पिढी आजारांच्या सावलीत वाढेल. मुलांना भूक लागेपर्यंत थांबू देणे, त्यांच्या ताटात फळे, ताज्या भाज्यांसह चटण्या, धान्ये आणि कडधान्ये असा समतोल आहार असणे गरजेचे आहे. आज मुलांच्या ताटात चव आहे, पण पोषण हरवले आहे. पोट भरत आहे, पण शरीर आणि मेंदू उपाशी आहेत. या बदलत्या आहार संस्कृतीकडे केवळ घरापुरते न पाहता, सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. अन्यथा जेवणात चत आहे, पण जीवनात ऊर्जा नाही, अशी विचित्र स्थिती निर्माण होईल. 'निरोगी मुले राष्ट्राची संपत्ती आहे', असे सुविचार निव्वळ शाळांच्या भिंतींवर लिहून कसे भागेल?

# कामोठे पोलिसांच्या तपासावर आम्हाला पूर्ण विश्वास, आरोपीचा शोध हे लावतीलच ; दिघे कुटुंबिय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे पोलिसांच्या तपासावर आम्हाला पूर्व विश्वास असून ते दागिने चोरणाऱ्या आरोपींचा शोध लावलीत असे प्रतिपादन कामोठे वसाहतीमध्ये राहणाऱ्या दिघे कुटुंबीयांनी पत्रकार परिषदेमध्ये केले.

कामोठे वसाहती मधील गिरीजा सोसायटी प्रतीक जेम्स मध्ये राहणाऱ्या सविता म्हस्कर यांच्या घरातील ४० दिवसांपूर्वी लाखो रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेले होते. या चोरी संदर्भात त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषद मध्ये त्यांच्या घरा समोर राहणाऱ्या दिघे कुटुंबियांवर संशय व्यक्त केला आहे. या संदर्भात दिघे कुटुंबीयांनी आपली बाजू मांडताना आज पत्रकार परिषद घेत म्हस्कर कुटुंबीयांनी केलेले आरोप हे बिनबुडाचे असून त्या कुटुंबियांसोबत आमचे गेल्या अनेक वर्षांपासून कौटुंबीक संबंध होते या संबंधामुळे त्यांनी त्यांच्या घराच्या चाव्या आमच्याकडे अत्यावश्यक वेळेसाठी ठेवत होते.त्यामुळे सुद्धा त्यांचे म्हणणे आहे की चोरी आम्ही केली असावी. मात्र चोरी झाल्यापासून आम्ही त्यांच्या बरोबरच



होतो. त्यांनी या पूर्वी त्यांच्या कडील सोन्याचे दागिने आम्हाला दाखवले होते. परंतु या चोरी संदर्भात आमचा कोणताही संबंध नाही आहे. पोलीस ठाण्यास तक्रार करण्यास आम्ही त्यांच्या बरोबरच होतो. गेल्या महिना भरापासून पोलिसांच्या चौकशीला आम्ही सामोरे जात आहोत.

आमचे सीसीटीव्ही फुटेज, बँक खाते व आवश्यक असणाऱ्या सर्व माहिती आम्ही वेळोवेळी पोलिसांना दिल्या आहेत असे शंतनू दिघे व मोनिका दिघे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. जाणीव पूर्वक आम्हाला या चोरीच्या प्रकरणात गोवण्याचा या सोसायटीमधील काही जणांचा डाव आहे. नुकतेच सोसायटीची निवडणूक पार पडून त्यात मी अध्यक्ष म्हणून माझी निवड झाली तसेच आमचे पॅनल सत्तेत आले. याचा काही जणांना राग असून त्या संदर्भात त्यांनी आम्हाला धमक्या सुद्धा दिली आहेत अशी माहिती मोनिका दिघे यांनी यावेळी दिली. म्हस्कर कुटुंबियांना पुढे करून आमच्यावर चोरीचा आळ सोशल मीडियाद्वारे घातला जात आहे. तसेच आमच्या दोघांच्या नोकरीच्या ठिकाणीसुद्धा आमची बदनामी केली जात आहे.

परंतु या सर्व प्रकारामध्ये आमचा कुठल्याही प्रकारचा सहभाग नसल्याने कामोठे पोलीस लवकरच मुख्य आरोपींना गजाआड करतील असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागल्यानंत आम्ही आमच्या मानहानी प्रकरणी गुन्हा दाखल करणार आलस्याचे सुद्धा दिघे कुटुंबीयांनी सांगितले.

# सुक्या मासळीचा हंगाम संकटात ; अवकाळी पावसामुळे वाळवणात अडचणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अवकाळी पावसाने बळीराजाबरोबर आता कोळीबांधवही संकटात सापडला आहे. वादळी वाऱ्यामुळे मच्छीमारीसाठी खोल समुद्रात जाणे धोक्याचे ठरत आहे. अशातच सुकलेल्या मासळीच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नावरही गदा आल्याने हंगाम वाया जाण्याची भीती आहे. वर्षभरापासून समुद्रातून मिळणाऱ्या मासळीची आवक घटली आहे. त्यापाठोपाठ अवकाळी हजेरी लावल्याने किनारपट्टीच्या भागात सुकविण्यासाठी ठेवलेली मासळी भिजून गेली आहे. त्यामुळे सुकी मासळी विक्रीच्या हंगामातच लाखोंचे नुकसान झाले आहे. दसऱ्यानंतर पावसाचे प्रमाण कमी झाले की दारासमोरील अंगणात शिल्लक मच्छीचे वाळवण टाकले जाते. त्यात सुकट, जवळा, बोंबील, सोडे, कोळंबी, आंबाड, वाकटी, बांगड्याचा समावेश असतो. सुक्या मच्छीला चवीमुळे मागणीही अधिक असते. दरवर्षी लाखोंची उलाढाल सुक्या मच्छीच्या विक्रीतून होत असते. पण यंदा पावसाने अजून काढता पाय घेतलेला नसल्याने त्याचा परिणाम सुक्या मासळीच्या हंगामावर झाला आहे. अवकाळी पावसामुळे नवी मुंबई, उरण भागातील सुक्या मच्छीची आवक घटली आहे. हवामानातील बदलांमुळे समुद्रातील पारंपरिक मासेमारीवर मर्यादा आल्या आहेत. यामुळे सुक्या मच्छीची आवक कमी झाली आहे. समुद्रातून मिळणाऱ्या माशांची आवक घटली आहे. परिणामी, सुक्या मच्छीची आवक कमी झाली आहे. या स्थितीमुळे उत्पादनावरही त्याचा परिणाम झाला आहे.



# अज्ञात वाहनाला धडक; टेम्पो चालकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टेम्पोने अज्ञात वाहनाला दिलेल्या धडकेत टेम्पोचालक संदीप गायकवाड (४९, रा. पिंगोरी, पुरंदर) याचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

पनवेल तालुक्यातील बोरले गावाजवळ मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर ८,५०० कि.मी. याठिकाणी टेम्पोचालक संदीप गायकवाड भरधाव वेगाने जात असताना, या टेम्पोने अज्ञात वाहनाला जोराची धडक दिल्याने हा अपघात झाला.

या अपघातात संदीप गायकवाड गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पोलादपूरमध्ये महिलांची कार्तिकी एकादशीनिमित्त पायी प्रभातवारी



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहरातील आदिशक्ती भजन मंडळ, दशानेमा गुजराती महिला मंडळ, दिशा सांस्कृतिक ग्रुप तसेच अन्य हिंदूधर्मिय महिलांनी कार्तिकी एकादशीनिमित्त रविवारी सकाळी काकडआरतीनंतर अभंग आणि विठ्ठलनामाचा गजर करीत पायी प्रभातवारी काढली.

कार्तिक महिन्याच्या पहिल्या दिवसापासून काकड आरती करून देवांना जागे करण्याची प्रथा पोलादपूर शहरात काही महिलांनी अद्याप सुरू ठेवली असून काकडआरतीसाठी दिवाळी पाडव्याला सर्व महिलावर्ग सज्ज होत असतात.

रविवारी कार्तिकी म्हणजेच देवउठनी एकादशीनिमित्त मारूतीमंदिरापासून पोलादपूर शहरातून श्री सदगुरू राममंगलदास मंदिराकडे सर्व महिलावर्गाने हातीमस्तकी तुळशीचे रोपटे घेऊन विठ्ठलनामाचा गजर करीत पहाटेच पायीवारी काढली. यावेळी अनेक महिलांनी 'या विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला।' अभंगांच्या ओव्यांचे गायन करीत पाऊले मंदिराकडे टाकण्यास सुरूवात केली.

या पायीवारीमध्ये अश्विनी गांधी, प्रिती बुटाला, ज्योत्ना केसरकर, शिल्पा शिंदे, कांचन बुटाला, अश्विनी तलाठी, पालांडेवहिनी, उज्वला शेठ, कलिका अधिकारी, माई शेठ, शर्मिला बुटाला, स्वाती तलाठी, अश्विनी तलाठी, नीला तलाठी, स्वरूपा तलाठी, सरिता शेठ, कांचन तलाठी, पुष्पा पाटोळे, जोशी वहिनी, श्रावणी शहा, निकिता शेठ, निमा शेठ, लतिका कापडेकर, वैशाली भूतकर, केतकी शेठ, प्रज्ञा शेठ, अस्मिता तलाठी, लता जंगम, वैशाली पांढरकामे, निलीमा सुतार, मालती मधुकर शेठ तसेच असंख्य महिला सहभागी झाल्या.

कार्तिक प्रतिपदेपासून सुरू झालेला काकडा पोलादपूर शहरात त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत सुरू राहणार असून त्रिपुरारी पौर्णिमेला या काकडा सकाळी झाल्यानंतर संध्याकाळी शेजारतीने आरतीची सांगता होणार असल्याची माहिती महिलावर्गाकडून देण्यात आली.

# मनसे शहराध्यक्ष मारहाण प्रकरण; माजी सभापतीसह सात जणांवर गुन्हा

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड शहरातल्या मनसे शहराध्यक्ष पंकज उमासरे यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणात आता मोठी कारवाई झाली आहे. महाड पंचायत समितीच्या माजी सभापती सपना मालुसरे यांच्यासह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी (दि.१) दुपारी पंकज फोटो स्टुडिओमध्ये झालेल्या या हल्ल्यानंतर शहरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. हल्लेखोरांनी दुकानात घुसून उमासरे यांना बेदम मारहाण केली, तसंच दुकानातील वस्तूंची तोडफोड केली.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष पंकज उमासरे मारहाण प्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये माजी सभापती सपना मालुसरे यांच्यासह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्याचे फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याबद्दल राजकीय टीका टिपणी केली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून महाड मनसे शहराध्यक्ष पंकज उमासरे यांनी सोशल मीडियावर रोजगार हमी उत्पादन मंत्री गोगावले यांच्यावर वैयक्तिक टीका टिपणी केली होती.

या गोष्टीचा राग मनामध्ये धरून शिवसेना शिंदे गटाच्या माजी सभापती सपना मालुसरे यांच्यासह सात जणांनी पंकज उमासरे यांच्यावर हल्ला केला. त्यांनी त्यांच्या चवदार तळे येथील पंकज प्रेम मास्टर व फोटो स्टुडिओ या दुकानात येऊन पंकज उमासरे यांना लाथा बुक्क्यांनी व हाताच्या ठोशाने मारहाण केली. ही घटना शनिवारी दुपारी एकच्या सुमारास घडली आहे. मारहाणीचे वृत्त समजल्यानंतर पोलिसांनी पंकज उमासरे यांना प्रथम महाग्रामीण रुग्णालयात व त्यानंतर एमआरआय करण्यासाठी माणगाव रुग्णालय येथे नेल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. महाड मनसे शहराध्यक्ष पंकज उमासरे यांच्यावर माजी सभापती सपना मालुसरे यांच्यासह रोहन धेडवाल, प्रशांत शेलार, धनंजय मालुसरे, सौजन्य कानेकर ,भावड्या सुर्वे, निरज खेडेकर, सुनंदा पवार यांच्यावर महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रमेश तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक खाडे हे तपास करीत आहेत.

# नवी मुंबईत अनधिकृत बांधकामांवर सिडकोची कारवाई

## वर्षभरात ६५० बांधकामे जमीनदोस्त

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

पनवेल परिसरासह इतर शहरात मागील काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. याच अनधिकृत बांधकामांवर सिडको प्रशासनाच्यावतीने जोरदार तोडक कारवाई सुरू केली आहे. यामध्ये ६५० अनधिकृत इमारतींवर जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत.

दिवाळी नंतर सिडकोच्यावतीने पुन्हा अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास सुरूवात झाली आहे. शुक्रवारी खारघर सेक्टर १३ येथील तळमजला अधिक तीन मजली इमारत जमीनदोस्त करण्यात आली. ही कारवाई सिडकोच्या दक्षता विभागाच्या पथकाकडून करण्यात आली. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी व डीआयजी सुरेश मेंगडे यांनी माहिती



देताना सांगितले की गेल्या वर्षभरात सिडकोने सुमारे ६०० ते ६५० अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली आहे. त्यामध्ये सुमारे ३५० वीट आणि कच्ची बांधकामे तसेच सुमारे ३०० पक्की बांधकामे तोडण्यात आली.

तसेच खारघरमधील इमारत ही साडेबारा टक्के प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेला भूखंड असून, पात्रता धारकांसाठी तो राखून ठेवण्यात आला आहे. मात्र, या ठिकाणी विनापरवानगी तळ अधिक तीन मजली इमारत उभारण्याची काम सुरू होते. या बांधकामांसंबंधित बांधकामधारकाला वेळोवेळी नोटीस बजावून बांधकाम थांबविण्याचे आदेश सिडकोच्यावतीने देण्यात आले होते. परंतु त्यांनी ते दुर्लक्षित केले. सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सर्व प्रक्रिया पूर्ण करून या इमारतीवर कारवाई करण्यात आल्याचे मेंगडे यांनी सांगितले.

खारघर परिसरात धोकादायक अवस्थेतील बांधकामे आहेत. जरासा धक्का लागल्यास त्यांची भिंत कोसळण्याइतकी अवस्था या बांधकामांची आहे. त्यामुळे सिडकोने या परिसरात मोठ्या प्रमाणात तोडक मोहीम सुरू केली आहे. तसेच वर्तमनापत्रात जाहिरातीमार्फत अनधिकृत बांधकामांसंबंधी सुचना करण्यात येतात. तसेच नागरिकांना देखील अनधिकृत बांधकामांमध्ये गुंतवणूक करू नका असे आवाहन केले जाते. सिडकोकडून पोलिसांच्या मदतीने विविध गावठाण भागांमध्ये अनधिकृत बांधकाम विरोधी कारवाई सुरू आहे. एकदा तोडक कारवाई झाल्यानंतर पुन्हा अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर सिडकोच्यावीने गुन्हे दाखल करण्याची प्रक्रियाही केली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पोलादपूर नगरपंचायतीतर्फे पुन्हा मालमत्ता कर वाढीच्या नोटीसा जारी

## आक्षेपाच्या दस्तावेजात मागील वर्षापर्यंतच्या करभरणा पावतीची सक्ती

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरतर्फे गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही नागरिकांना मालमत्ताकर वाढीच्या नोटीसा बजावण्यात आल्या असून या नोटीशीवरील हरकती ११ नोव्हेंबर २०२५ पर्यंत विहित नमून्यातील लेखी स्वरूपात हरकती घेण्यासंदर्भातील आवश्यक दस्तावेजामध्ये गेल्यावर्षीपर्यंत मालमत्ता करआकारणी आक्षेपार्ह असल्याने तसेच मालमत्ता कराबाबत नागरिकांमध्ये संग्दिधता असल्याने असंख्य नागरिकांनी करनिश्चिती झाल्याखेरीज करभरणा करण्याचे टाळले असताना मागील वर्षापर्यंतच्या करभरणा पावतीची सक्ती करण्यात आली आहे. यामागे नागरिकांना यावर्षी आक्षेप घेता येऊ नये, असा नगरपंचायतीच्या ठेकेदारांचा कुटील हेतू दिसून येत आहे.

पोलादपूर शहरातील विविध प्रभागांतून नगरपंचायतीने नेमलेल्या खासगी ठेकेदाराकडून दोन-चार तरूणांमार्फत तीन वर्षांपूर्वी नागरिकांच्या घरांची मोजणी लेझर यंत्राद्वारे झाल्यानंतर घरांचे पुनर्मुल्यांकन करण्याची प्रक्रिया संबंधित ठेकेदाराने पूर्ण करून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५चे कलम १०६ अ अन्वये सन २०२७-२९ मध्ये आकारण्याच्या मालमत्ता कराची रक्कम अनाकलनीयरित्या निर्धारित केली. त्या रक्कमेच्या २० टक्के रकमेची आकारणी घरपट्टी म्हणून सन २०२४-२५ मध्ये आकारण्यात येणार असल्याचे मागील नोटीशीमध्ये नमूद केले असताना यंदा पाठविलेल्या नोटीशीमध्ये तशी वाढ करण्यात आल्याचे दिसून येत आहे. या रक्कमेमध्ये इमारत ३० ते ५० वर्षे जुनी असल्याकडे दूर्लक्ष करून नवीन असल्याचा गैरसमज कायम ठेऊन पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी म्हणजे २०२५-२६, २०२६-२७ आणि २०२७-२८ या वर्षी या इमारतींना घसारा ० टक्के ठेवण्यात येणार असून त्यानंतर काही टक्के घसारा वजा करण्याचे उपकार ८० टक्के अधिक घरपट्टी आकारणीवेळी होणार आहे.

गेल्या वर्षी पोलादपूर नगरपंचायतीच्या करनिर्धारण विभागामार्फत दि. २० नोव्हेंबर २०२४ नुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५चे कलम ११९ अन्वये मा.मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने विशेष नोटीस बजावण्यात आली. यामध्ये नवीन व पुनर्मुल्यांकन मालमत्तेची विशेष नोटीस या विषयान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५चे कलम १०६ अ अन्वये सन २०२७-२९ मध्ये आकारण्याच्या मालमत्ता कराच्या २० टक्के रक्कम अथवा सद्यस्थितीत असलेला ग्रामपंचायत घरपट्टी कर यापैकी जे जास्त असेल ते देय राहिल ते सन २०२४-२५ मध्ये आकारण्यात येणार आहे, असे नमूद करून २०२५-२६ मध्ये ४० टक्के, २०२६-२७ मध्ये ६० टक्के, सन २०२६-२७ मध्ये ८० टक्के आणि २०२७-२९ मध्ये आकारण्याच्या मालमत्ता कराची रक्कम या नोटीशीनंतर आकारण्याच्या कराच्या १०० टक्के आकारण्यात येणार असल्याचे सदरच्या नोटीशीमध्ये नमूद केले होते. या संदर्भात मजला, वापर, उपवापर, बांधकामाचा वर्ग म्हणजेच मातीचे बांधकाम, साधे बांधकाम, लोडबेअरिंग बांधकाम, आरसीसी बांधकाम असे वर्ग, चटई क्षेत्र, वार्षिक करयोग्य मुल्य आणि करयोग्य मुल्य असे तपशील नमूद करण्यात आले होते.

यंदा नगरपंचायत पोलादपूरतर्फे पाठविण्यात आलेल्या नोटीशीमध्ये नागरिकांच्या घराची करआकारणी व फेरफाराबाबत तक्रार तसेच नावात दुरूस्ती असल्यास त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास सदर कारणे नमूद करून लेखी स्वरूपात मुख्याधिकारी पोलादपूर नगरपंचायत यांच्याकडे दि.११ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सादर करून पोचपावती घेण्यासंदर्भात आवाहन करताना लेखी हरकत न आल्यास प्रस्तावित करआकारणी नागरिकांना मंजूर असल्याचे समजण्यात येऊन प्रस्तावित कर आकारणी कायम करण्यात येईल, अशी नागरिकांना तंबी देताना नगरपंचायत कार्यालयामध्ये कर विभागात फक्त स्वत:च्या मालकीच्या घर व जागेवरील करआकारणी पाहावयास उपलब्ध आहे, असे नागरिकांनी फक्त स्वत:पुरती भूमिका घ्यावी अशी परिस्थिती नगरपंचायतीने निर्माण केली आहे.

पोलादपूर शहरातील अनधिकृत बांधकामांची नोंद घेण्यात आली असल्याचे या नोटीशीमध्ये नमूद करताना मालमत्ता कराची आकारणी केल्याने अनधिकृत बांधकाम नियमित करण्यात आले, असे समजण्यात येऊ नये असे सूचित करण्यात आले आहे. मालमत्ता कराच्या आकारणीमुळे अनधिकृत बांधकामाविरूध्द नगरपंचायतीस कायद्याने करावयाच्या असलेल्या कायदेशीर कारवाईस किंवा हक्कास कोणतीही बाधा येत नसल्याचे नमूद करून नगरपंचायतीने अनधिकृत बांधकामांची यादी तयार केली असल्याचे स्पष्ट होत आहे.

मात्र, कोणत्याही कायदेशीर कारवाईविना मालमत्ता कर मिळविण्यासाठी यादीचा उपयोग करण्याचे ठरविल्याचे या नोटीशीमुळे ध्वनित झाले असून बेकायदेशीर बांधकाम असल्याचे माहिती असूनही त्यावर फक्त मालमत्ताकर आकारणी करून आर्थिक फायद्यासाठी अनधिकृत बांधकामाला अभय देण्याची नगरपंचायतीची कृती बेकायदेशीर बांधकामांना अनुकूलता दर्शविणारी ठरत आहे.

मागील वर्षीपर्यत करभरणा केल्याची पावती जोडल्याखेरिज कुठल्याही मालमत्ता धारक अथवा भोगवटाधारकांना हरकत नोंदविण्यासाठी नगरपंचायतीद्वारे निर्धारित केलेल्या विहित नमून्यामध्येच मालमत्तानिहाय मुद्दानिहाय लेखी अर्ज करायचे निर्देश नोटीशीद्वारे मुख्याधिकारी नगरपंचायत पोलादपूर यांच्या स्वाक्षरीने नागरिकांना देण्यात आले असून करनिश्चिती नसल्याने गेल्या काही वर्षात करभरणा झाला नसल्याच्या वस्तु-स्थितीचा हरकती कमी करण्यासाठी गैरवापर केला जात असल्याचे दिसून येत आहे.

### भात खरेदीला होणार विलंब...

# पावसाचा अडथळा; केंद्रे नोव्हेंबर अखेरीस सुरू होण्याची शक्यता



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मेपासून सुरू झालेल्या पावसाने यंदा रायगड जिल्ह्यातील शेतीचे वेळापत्रकच विस्कळित केले आहे. ऑक्टोबर अखेरी-सही पावसाचा मुक्काम कायम राहिल्याने शेतकऱ्यांचे भातपीक काढणीला विलंब होत आहे. परिणामी भातखरेदी केंद्रे उशिरा सुरू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यात एकूण २८ भातखरेदी केंद्रे असून, यावर्षी भाताला प्रतिक्विंटल २ हजार ३६९ रुपयांचा दर घोषित करण्यात आला आहे. नोव्हेंबरअखेरीस ही केंद्रे सुरू होतील, अशी माहिती जिल्हा मार्केटिंग फेडरेशनचे अधिकारी के. टी. ताटे यांनी दिली.

या वर्षी पावसाने मेच्या मध्यापासूनच हजेरी लावली. जूनमध्ये अल्प विश्रांती घेतल्यानंतर जुलै महिन्यात मुसळधार पाऊस झाला. काही भागांत शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली होती.

पिके नुकतीच काढणीस तयार होत असतानाच ऑक्टोबर महिन्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला. परिणामी अनेक शेतकऱ्यांचे पीक ओलाव्यामुळे खराब झाले. सध्या शेतकरी उर-लेले पीक वाचविण्याच्या प्रयत्नात असून, भात वाळविण्यासाठी उन्हाची प्रतीक्षा करीत आहेत. भातामध्ये अद्याप आर्द्रता असल्याने सुकवणी न झाल्यास भातखरेदी प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या सुरू करता येणार नाही. त्यामुळे जिल्ह्यातील खरेदी केंद्रांना उशिरा सुरुवात करावी लागणार आहे.

सुरक्षित आणि दर्जेदार भात उपलब्ध झाल्यावरच टप्प्याटप्प्याने खरेदी केंद्रे सुरू करण्याचा फेडरेशनचा विचार आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी यावर्षीदेखील २८ केंद्रे कार्यरत राहणार असून, ती वाहतूक आणि साठवणुकीच्या दृष्टीने सोयीच्या ठिकाणी ठेवण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना आपल्या भाताची विक्री शासकीय खरेदी केंद्रांवर करण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. ही नोंदणी प्रक्रिया पुढील दोन ते तीन दिवसांत सुरू होईल, अशी माहिती के. टी. ताटे यांनी दिली. दरम्यान, पावसाचा अंमल कायम राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वाता-वरण आहे. नुकसानीतून सावरत असतानाच भातखरेदी उशिरा होणार असल्याने आर्थिक फटका बसू शकतो, असे मत स्थानिक शेतकरी व्यक्त करीत आहेत. तरीही शासनाने वेळेत खरेदी सुरू करून मदतीच्या उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कर्जत मधील मुद्रे खुर्दच्या स्मशानभूमीचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील मुद्रे खुर्द गावातील स्मशानभूमीचे लोकार्पण करण्यात आले. सुमारे एक एकर जागेमध्ये ही स्मशानभूमी बांधण्यात आली असून पन्नास लाख रुपये निधी स्मशानभूमीच्या बांधकामासाठी खर्च करण्यात आला.

काही वर्षांपूर्वी मुद्रे खुर्द गावातील सुमारे अडीच एकर जागेवर हिंदू स्मशान भूमी तसेच लिंगायत वाणी समाजासाठी दफनभूमी आणि बोहरा समाजासाठी दफनभूमी करण्याचे ठरले होते. त्यापैकी तीस गुंठे जागा लिंगायत वाणी समाजाच्या दफन भूमीसाठी, तीस गुंठे जागा बोहरा समाजाच्या दफन भूमीसाठी व उर्वरित एक एकर जागा मुद्रे खुर्द परिसरातील हिंदू स्मशानभूमीसाठी देण्यात आली होती. या जागांना कुंपण करण्यात आले होते. मात्र स्मशानभूमी बांधण्यात आली नव्हती.

मुद्रे खुर्द मधील नागरिकांच्या मागणी नुसार आमदार महेंद्र थोरवे यांनी या स्मशानभूमी साठी पन्नास लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. या स्मशानभूमीचे बांधकाम झाल्यानंतर लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते स्मशानभूमीचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, माजी नगर-सेवक संकेत भासे, कृष्णा घाडगे, अरुणा वायकर, कर्जत शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, उपप्रमुख दिनेश कडू, उदय शिंदे, अशोक मोरे, प्रदीप वायकर, किशोर कदम, ज्ञानेश्वर करणूक, जयदीप शिंदे, अनिल मोरे, संतोष थोरवे, भारती शिंदे आदी उपस्थित होते.

पोलीस पाटील कृष्णा शिंदे आणि किशोर कदम यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संदीप जावरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी उदय शिंदे यांनी आमची वहिनी स्वर्गवासी झाल्यावर आमदार थोरवे सांत्वनासाठी आले असता त्यांच्याशी स्मशानभूमी बाबत चर्चा केली. त्यांनी लागलीच याबाबत मंजुरी देऊन निधी सुद्धा उपलब्ध करून दिला.' असे स्पष्ट केले. आमदार थोरवे यांनी, ' आम्ही विकास करण्यासाठी कटीबद्ध आहोत.

काही दिवसांपूर्वी मुद्रे बुद्रुकच्या स्मशानभूमीचे लोकार्पण केले. या परिसरात अनेक विकास कामे केली. तुमची कायम साथ आम्हाला हवी आहे.' असे सांगितले. बाळासाहेब कुलगुडे, राजेश शिंदे, राकेश दळवी, नदीम खान, संदीप करणूक, राजेश शितोळे, जयदीप शिंदे, रोहित ओसवाल, रोहित बाफना, दर्शन वायकर, दीपक मोधळे, संदेश मोरे आदी उपस्थित होते.



# सुरक्षिततेसाठी दुहेरी उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उलवे पोलिसांकडून दोन -महत्त्वाचे उपक्रम राबवण्यात आले. एकीकडे सायबर गुन्ह्यांपासून जनजागृतीसाठी 'सायबर सुरक्षा जनजागृती अभियान' राबवण्यात आले, तर दुसरीकडे कायदा व सुव्यवस्था नियंत्रणासाठी 'दंगा काबू' योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

पोलिसांच्या वतीने रिलायन्स डिजिटल मॉल, शगुन चौक, उलवा येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वपोनि. अर्जुन रजाने यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अनिल राजुरे, एएसआय साळवे यांनी सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात नागरिकांना मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन शॉपिंग, सोशल मीडिया फ्रॉड, मालवेअर, फोन पे, गुगल पे फसवणूक, ऑनलाइन ट्रेडिंग आणि डिजिटल अरेस्ट फ्रॉड यासारख्या वाढत्या सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देण्यात आली. या जनजागृती मोहिमेत रिलायन्स डिजिटल मॉलचे ४० कर्मचारी सहभागी झाले होते. त्यानंतर सेक्टर ५, जिओ टॉवर परिसरात 'दंगा काबू' योजना अंतर्गत रंगीत तालीम घेण्यात आली. या सरावात उलवा पोलीस ठाण्याचे १ पोलीस निरीक्षक, ४ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, ३० पोलीस अंमलदार, तसेच सिडको अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच कोपर हॉस्पिटलची रुग्णवाहिकेचे पथक सहभागी झाले होते.

# अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात कारणावरून फॅनला साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना करंजाडे वसाहतीमध्ये घडली आहे.

अविनाश बोराडे (वय ३८ रा सेक्टर आर -४ करंजाडे) यांनी कोणत्यातरी अज्ञात कारणाने फॅनला साडीच्या साहाय्याने आत्महत्या केली आहे.

या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसाव्दारे कळविण्यांत येते की, मौजे - दिघाटी, ता. पनवेल, जि. रायगड येथील महसुल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिल श्री. वैभव भगवान मोकल रा- साई, ता. पनवेल, जि. रायगड यांनी सौ. सोनीया ज्ञानेश्वर ठाकुर (शेतकरी) रा- दिघाटी, ता. पनवेल, जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : दिघाटी, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७२ | ५/अ | ०-१८-८०<br>पो.ख. ०-०१-७०<br>एकूण ०-२०-५० | ४.७३ |

वरील वर्णनाच्या जमिनी मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विकी, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याचे खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबधीत व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत पूराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वताःहून हजर होऊन आमचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबध त्यांनी आमचा अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या आशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही. असे समजण्यास येऊन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.०२/११/२०२५
स्थळ : पनवेल

सही/-
**ॲड.विनायक धर्मा पाटील**
**ॲडव्होकेट्स ॲड लिगल कन्सल्टंटस्**
**कार्या- बी/१०४, पहीला मजला, पायोनिअर को ऑप, हौसींग सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वारस दाखले: अ.क्र. | वारस दाखले: भूधारकांची नावे | वारस दाखले: वारस दाखला क्रमांक | वारस दाखले: वारसांची नावे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोड – द्रोणागिरी | | | | | | | | | | | |
| १ | द्रोणागिरी ९१८ | पागोटे २२३(I)/ १९८५-८६ | २०/३<br>२५/१<br>३७-२A<br>५६/७A<br>६४/४A<br>८२/२<br>१०९/८<br>११३/३ | ०-०१-८<br>०-०८-०<br>०-०७-०<br>०-०२-६<br>०-०१-५<br>०-०७-९<br>०-०७-२<br>०-१५-९ | ७५० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी, सेक्टर ५९, भूखंड क्र.४१, क्षेत्र ७५० चौ.मी. | १ | कै. काळीबाई तुळशीराम बंडा (मयत) (मृत्यू दि.०२.१२.१९९५) | वारस दाखला CMA No.३८८/२००८ दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३८८/२००८ सदर वारस दाखल्याच्या स्टॅम्प पेपरवर दाखला क्र. ३८८/२००८ असा आहे व दुसऱ्या पानावर ३९०/२००८ असे नमुद आहे. | १. श्री. दशरथ तुळशीराम बंडा<br>२. श्रीमती. प्रभावती रत्नकांत भोईर<br>३. सौ. लता विमल राय | भुधारकांनी सादर केलेल्या वारसदाखल्याच्या अनुषंगाने भुखंडाचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. तरी सदर वारसांबाबत कोणाचीही काहीही हरकत असल्यास या विभागास संपर्क करावे. |
| | | पागोटे ९०(i) | ५९/९ | ०-१४-४ | | | २ | कै. शांताराम चांगु पाटील (मयत) (मृत्यू दि.१७.१२.२००६) | वारस दाखला CMA No.३९०/२००८ दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३९०/२००८ | १. श्रीमती. पारुबाई शांताराम पाटील<br>२. श्री. कैलाश शांताराम पाटील | |
| | | पागोटे ९०(i) | १२/३ | ०-२५-५ | | | | | | | |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | ०-९१-८ | | | | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)**
**सिडको भवन, तळ मजला, भूमि विभाग १२.५०%,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३२३/२०२५-२६

# विरार-अलिबाग कॉरिडोअरला बीओटीचा आधार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) विरार- अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका बांधा वापरा हस्तांतरित करा (बीओटी) तत्वावर राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने यासंबंधीच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. आता बीओटी तत्वानुसार हा प्रकल्प राबविण्यासाठी व्यहार्यता अभ्यासाचा प्रस्ताव एमएमआरडीसीने १५ दिवसांपूर्वी राज्य सरकारकडे सादर केला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर बहुउद्देशीय मार्गिकेतील नवघर-बलवली या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी बीओटी तत्वावर निविदा काढण्यात येणार आहेत.





एमएसआरडीसी १२६ किमी लांबीची विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका बांधणार आहे. हा प्रकल्प हाती घेऊन कित्येक वर्षे झाली तरी प्रत्यक्षात तो मार्गी लागलेला नाही. एमएसआरडीसीने या मार्गिकेतील नवघर -बलवली या पहिल्या टप्प्यासाठी निविदा प्रक्रिया राबववूत कामाला सुरुवात करण्याची तयारी सुरू केली होती. मात्र, हे कामही आता लांबणीवर पडले आहे. पहिल्या टप्प्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा काही महिन्यांपूर्वी रद्द करण्यात आल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात ११ पॅकेजमध्ये मागविण्यात आलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला होता. यासाठी ३३ निविदा सादर झाल्या होत्या. मात्र या निविदा ३६ टक्के अधिक दराने सादर झाल्या होत्या आणि त्यामुळे प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात प्रचंड वाढ झाली होती. प्रकल्पासाठी इतका निधी उपलब्ध करणे शक्य नसल्याचा मुद्दा उपस्थित करीत एमएसआरडीसीने बीओटी तत्वावर निविदा राबविण्याचा निर्णय घेतला आणि यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला. या प्रस्तावाला मान्यता देत सरकारने ऑगस्टमध्ये शासननिर्णय प्रसिद्ध केला. शासननिर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर एमएसआरडीसीने बीओटीवर प्रकल्प राबविण्यासंबंधीचा व्यवहार्यता अभ्यास केला असून, हा प्रकल्प व्यवहार्य ठरला आहे. त्यानुसार व्यवहार्यता अभ्यासाचा प्रस्ताव १५ दिवसांप्व्रूी राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आल्याची माहिती एमएसआरडीसीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली.

राज्य सरकारकडून या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर बीओटी तत्वावर या मार्गिकेतील पहिल्या टप्प्याच्या बांधकामासाठी निविदा काढण्यात येणार आहेत. निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्यासाठी किमान सहा महिने लागण्याची शक्यता आहे. दुसरीकडे भूसंपादनाच्या कामालाही आता वेग देण्यात येणार आहे. येत्या काही महिन्यांत ७० टक्के भूसंपादन पूर्ण करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. ७० टक्के भूसंपादन पूर्ण झाले तरच कामाला सुरुवात करता येणार आहे. त्यामुळे सहा महिन्यांत ७० टक्के भूसंपादन पूर्ण करण्याचे एमएसआरडीसीचे प्रयत्न आहेत. दरम्यान, या प्रकल्पासाठी एकूण ५२ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून यापैकी अंदाजे २५ हजार कोटी रुपये बांधकामासाठी, तर उर्वरित रक्कम भूसंपादनासाठी खर्च होणार आहे.

# रायगड जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे डॅशिंग अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी घेतले विठू माऊलीचे दर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज कार्तिकी भागवत एकादशी,आणि त्यानिमित्ताने रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील प्रति पंढरपूर म्हणुन समजल्या जाणाऱ्या भेंडखळ गावात सालाबाद प्रमाणे कार्तिकी भागवत एकादशी अतिशय उत्साहामध्ये संपन्न होत असते.यावेळी अनेक कार्यक्रमांचे तथा विठ्ठल रखुमाई च्या भव्य पालखीचं आयोजन करण्यात येते.या सोहळ्याप्रसंगी अनेक मान्यवरांच श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात आगमन होत असतं.

आज ग्रामस्थ मंडळ भेंडखळ यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करून रायगड जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी भेंडखळ गावामध्ये येऊन विठूमाऊली चे दर्शन घेतले. उरण तालुक्यातील आदर्श असणाऱ्या भेंडखळ भूमीसाठी, महेंद्रशेठ घरत हे वेळोवेळी सहकार्य करत असतात. भेंडखळ भूमीला वारकरी सांप्रदायाचा वारसा आहे म्हणूनच महेंद्र शेठ घरत यांच्या मनामध्ये या भूमी विषयी वेगळा आदर आहे.यावेळी श्री विठ्ठल रखुमाई देवस्थानच मंडळाच्या वतीने महेंद्रशेठ घरत यांना शाळ, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.



विठू माऊलीच दर्शन घेतल्यानंतर गावातील अनेक सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या घरी सुद्धा महेंद्र शेठ यांनी भेट दिली.हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे जनतेच्या मनातील नेता म्हणून महेंद्रशेठ घरत यांची ओळख आहे.

या कार्यक्रमासाठी उरण तालुका कॉँग्रेस कमिटीचे खजिनदार नरेश म्हात्रे, ओबीसी सेलचे दीपक ठाकूर, भेंडखळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अजित ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते रमेश ठाकूर, पालवी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष परशुराम भोईर, महाराष्ट्र प्रदेश युवक इंटक उपाध्यक्ष लंकेश ठाकूर, भेंडखळ कॉँग्रेस अध्यक्ष प्रमोद ठाकूर तथा यशवंत म्हात्रे, नाशिकेत म्हात्रे, सुरेश ठाकूर, मनोहर ठाकूर, राजा घरत, मनीष ठाकूर, साई पाटील, जयेंद्र ठाकूर, सचिन भोईर, प्रांजल भोईर, अमोल ठाकूर, नरेंद्र ठाकूर, प्रणव ठाकूर, नीरज ठाकूर, संदीप म्हात्रे, पियुष ठाकूर, अभिमन्यू ठाकूर तथा ग्रामस्थ मंडळ आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होत्या.

# होंडीतून पडून बेपत्ता खलाशाचा दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रेवदंडा समुद्र खाडीत मासेमारी करता गेलेल्या परप्रांतीय खलाशी होंडीतून पडून बेपत्ता झाला होता, तो बेशुध्द अवस्थेत रेवदंडा समुद्र किनारी आढळून आला, तपासणी करता रेवदंडा सरकारी दवाखाना येथे दाखल केला असता, तेथे तो मृत झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

रेवदंडा समुद्र पत्ती येथे बुधवार दि. ३० ऑक्टोबर रोजी रात्री प्रदिप भांजीनाखवा यांच्या जय भवानी बोटीवर सहकारी खलाशीसह पार्टी करून रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास मासेमारी करण्यासाठी खाडी मार्गे समुद्रात गेलेला, उत्तर प्रदेश मधील रहिवासी असलेला खलाशी प्रदिप कमजोरी हा बोटीत जेवण करण्याचे वेळी दिसून आला नाही, तो पाण्यात पडल्याची शक्यता लक्षात घेऊन त्याचा परिसरात शोध घेतला, परंतु मिळून आला नाही, याबाबत बेपत्ता झाल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे राहूल कुमार रामसुंदर यांनी नोंदविली होती. या बेपत्ता खलाश्याचा शोध जारी असताना, रेवदंडा आंग्रेनगर समुद्रकिनारी शोध घेत असताना, शनिवारी (दि. १) प्रदिप कमजोरी हा समुद्राचा पाण्यात बेशुध्द अवस्थेत मिळून आला, त्यांस त्वरीत रेवदंडा सरकारी रूग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरानी त्यास तपासून मृत झाल्याचे घोषीत केले. याबाबत अकस्मात मुत्यू नोंद करण्यात आली असून, रेवदंडा पोलीस ठाण्याचे पोसई एस.आर.पडवळ हे पोलीस ठाणे इन्चार्ज श्रीकांत किरविले यांचे मार्गदर्शनाखाली पुढील तपास करीत आहेत.

# गांजा प्रकरणी एकाला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

८०० मिलिग्रॅम वजन असलेला हायड्रो गांजा थायलंड येथून मित्रांच्या मदतीने छुप्या मार्गाने मागून बेकायदेशीर रित्या विक्री करता स्वतःच्या ताब्यात बाळगले प्रकरणी आरोपी केयूर जयेश गोगरी (राहणार सेक्टर १९ खारघर) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात ३० ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

खारघर सेक्टर १९, शिवसाई बिल्डिंग, रूम नंबर ३०२ येथे राहणारा केयूर जयेश गोगरी हा त्याच्या घरामध्ये हायड्रो गांजा या अमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी कक्ष गुन्हे शाखा यांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. घरात अमली पदार्थ सापडले नाही. मात्र कारची झडती घेतली असता कार मध्ये एका पिशवीत हायड्रो गांजा सापडून आला. याप्रकरणी केयूर जयेश गोगरी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### निवडणुकीतील उमेदवारांची गुणवत्ता तपासणार कोण?

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा उडतोय धुरळा; महत्त्वाचे प्रश्न सध्या चर्चेत

**दै.रायगड नगरी । पेण**

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाचतात निवडणुकांसाठी तालुक्यातील तालुक्यात विविध पक्षातील इच्छुक उमेदवारांची प्रचंड धडपड सुरू झाल्याचे चित्र दिसू लागले आहे मात्र जनतेचे प्रतिनिधी होण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांची गुणवत्ता लोकसभेची बांधिलकी शिक्षण आणि स्वच्छ प्रतिमा तपासणार कोण हा महत्त्वाचा प्रश्न सध्या मतदारांमध्ये चर्चेत आहे.

मागील काही निवडणुकींच्या राज्यातील अनुभवातून पैशाच्या जोरावर तिकीट मिळवणारे आणि निवडून आल्यानंतरही जनतेच्या प्रश्नापासून दूर राहणारे लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणात दिसून येतात त्यामुळे आता मतदारसंघ झाले आहेत लोकशाही टिकवण्यासाठी आणि ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांची गुणवत्ता हा पहिलाच निकष असावा अशी भावना अनेक नागरिकांकडून चर्चेद्वारे व्यक्त केला जात आहे.

आगमी निवडणुका म्हणजे केवळ राजकीय सत्तेचा बदल नाही तर ग्रामीण व शहरी विकासाची दिशा निश्चित करणारा टप्पा आहे त्यामुळे सक्षम स्वच्छ प्रतिमेचे आणि काम करण्याची क्षमता असणाऱ्या व्यक्ती लोकप्रतिनिधी म्हणून पुढे यायला हवेत अशी अपेक्षा मतदारांमध्ये वाढत आहे

उमेदवारांच्या भूमिकेवर नागरिकांचे जीवनमान उंचावणे अवलंबून असते स्थानिक विकास, नागरी सुविधा, शैक्षणिक सुधारणा, आरोग्यसेवा, रोजगार निर्मिती यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेण्याची जबाबदारी या लोकप्रतिनिधींकडे असते त्यामुळे सक्षम नेतृत्वाची गरज अधिक प्रकर्षाने पुढे येते.

ज्येष्ठ राजकीय नेत्यांच्या मते उमेदवारांच्या गुणवत्तेकडे लक्ष देण्यासाठी नागरिक सामाजिक संघटना आणि पक्ष कार्यकर्त्यांनी ही पुढाकार घेणे गरजेचे आहे कोणतं काम केलं कोणासाठी लढलं किती पारदर्शकता ठेवली? या प्रश्नाचे उत्तरे उमेदवारांनी जनतेसमोर ठेवणं सध्याच्या काळात गरजेचे झाले असल्याचे बोलले जात आहे.

गुन्हेगारी पार्श्वभूमी, संपत्तीचा स्तोत्, शैक्षणिक पात्रता आणि सार्वजनिक जीवनातील कार्याची माहिती खुली करण्यावर देखील जोर दिला जात आहे. पक्षाने तिकिटे देताना केवळ मतंसंख्येचा किंवा जा, पक्षीय समीकरणाचा विचार न करता समाजभान, कार्यक्षमता, महिलांचा सहभाग आणि तरुण नेतृत्व यांना प्राधान्य द्यावे अशी मागणी तालुक्यातील विविध क्षेत्रातील स्तरातून होत आहे मत मागायला दारापर्यंत येणारा नेता निवडून आल्यावर फोन सुद्धा उचलत नाही. मतापुरता मतदारांचा वापर करायचा आणि फेकून द्या याप्रमाणे मतदारांना दूर करतात असे होणारे चित्र बदलले पाहिजे अशी चर्चा आहे.

# उरणमधील हिंद कंटेनर टर्मिनलमध्ये 'कॉर्न स्नेक' आढळला

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील हिंद कंटेनर टर्मिनल (Hind Container Terminal) येथे एका टायर कंटेनरमध्ये एक परदेशी जातीचा साप आढळून आला आहे. या सापाची ओळख 'कॉर्न स्नेक' (Corn Snake) किंवा 'रेड रॅट स्नेक' (Pantherophis guttatus) अशी झाली असून हा उत्तर अमेरिकन खंडातील एक विदेशी (Exotic) प्रजातीचा साप आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा कंटेनर परदेशातून आयात केलेल्या टायरसह उरण बंदर परिसरात पोहोचला होता. तपासणीदरम्यान कर्मचाऱ्यांच्या नजरेस एक वेगळ्या नारंगी रंगाचा, आकर्षक पट्टेरी साप दिसल्याने व्यवस्थापना तर्फे त्वरित बचाव कार्यासाठी फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन )संस्थेच्या स्वप्नील म्हात्रे या स्वयंसेवकास कळविण्यात आले.

सदर साप बिनविषारी असून मानवाला कोणताही धोका नसतो. या जातीचे साप प्रामुख्याने पाळीव स्वरूपात ठेवले जातात. तथापि, भारतात अशा परदेशी प्रजातींची उपस्थिती पर्यावरणीय संतुलनाच्या दृष्टीने चिंताजनक मानली जाते. कारण ते इथल्या स्थानिक प्रजातींसाठी प्रतिकूल ठरू शकतात.त्यासाठी त्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी म्हणजे जेथून आलेत तिथे पाठविणेच योग्य असते.

या घटनेनंतर फ्रेंड्स ऑफ नेचर (FON) च्या जयेश गायकवाड या फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) च्या बचावकर्त्याने घटनास्थळी जाऊन साप सुरक्षितरीत्या पकडून त्याची काळजी घेतली. पुढील कारवाईसाठी वनविभागाकडे सदर 'साप' सुपूर्द करण्यात येणार आहे. महाराष्ट्र वनविभाग, वनपरिक्षेत्र अधिकारी, उरण एन. जी. कोकरे ह्यांच्याशी संपर्क करून वनविभाग पुढील कार्यवाही करत आहे.



# राज-उद्धव यांच्या लढ्याला मोठं यश येणार? : डॉ. नरेंद्र जाधव

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य सरकारने काही महिन्यांपूर्वी राज्यात शालेय शिक्षणात त्रिभाषा सूत्र धोरणाला मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता. या नव्या धोरणानुसार, राज्यातील सर्व शाळांमध्ये हिंदी भाषेचं शिक्षण इयत्ता पहिलीपासून सक्तीचं केलं जाणार होतं. पण मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निर्णयाला विरोध केला. राज ठाकरे यांनी या निर्णयाच्या विरोधात मोठं आंदोलन पुकारलं. त्यांच्या पाठोपाठ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने देखील शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीच्या निर्णयाला विरोध केला. पण राज्य सरकार त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यावर ठाम होतं. त्यामुळे राज्यात या धोरणाला टोकाचा विरोध होऊ लागला.

विशेष म्हणजे राज्य सरकारच्या या भूमिकेमुळे गेल्या दोन दशकांपासून ज्या दोन भावांमध्ये दुरावा होता ते भाऊ एकत्र आले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी सक्तीच्या निर्णयाला प्रचंड विरोध केला. तसेच दोन्ही नेत्यांनी एकत्र येऊन मुंबईच मोठा मोर्चा काढण्याचा इशारा दिला. यामुळे राज्य सरकारवरील दबाव वाढला होता. अखेर वाढता दबाव पाहता राज्य सरकारला एक पाऊल मागे यावं लागलं. राज्य सरकारने संबंधित निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करणं टाळलं.



राज्य सरकारने त्रिभाषा धोरण राज्यात अवलंबलं जावं का? याचं संशोधन करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. ही समिती अभ्यास आणि संशोधन करुन राज्य सरकारला अहवाल देणार आहे. त्या अहवालाच्या आधारे याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. राज्य सरकारने त्रिभाषा सूत्राच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिल्यानंतर ठाकरे बांधवांचा मोर्चादेखील स्थगित झाला. त्यानंतर दोन्ही बांधवांचा एकत्रितपणे विजय मेळावा पार पडला.

आपण दिलेल्या लढ्याला काहीसं यश आलं यासाठी दोन्ही पक्षाकडून विजय मेळावा आयोजित करण्यात आला.

या मेळाव्यात दोन्ही ठाकरे बंधू एकाच मंचावर २० वर्षांनंतर पहिल्यांदा एकत्र आलेले बघायला मिळाले. ठाकरे बंधूंनी पुकारलेल्या या लढ्याला आता पूर्ण यश येतं की काय? असा प्रश्न निर्माण होत आहे. कारण डॉ. नरेंद्र जाधव यांनी याबाबत सूचक वक्तव्य केलं आहे.

त्रिभाषा धोरणाला राज्यातून विरोधच आहे. त्यामुळे शासनाच्या धोरणानु-सार पहिलीपासून हिंदी विषयाची गरज नाही. हिंदीसक्ती पहिलीपासून करण्यापेक्षा पाचवीपासून करावी, असं त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी म्हटलं आहे. रत्नागिरी येथील पत्रकार परिषदेत त्यांनी संबंधित वक्तव्य केलं. शालेय विद्यार्थ्यांना तीनही भाषा सक्तीच्या केल्या तर एक ना धड भाराभर चिंध्या अशी अवस्था होईल, असं स्पष्ट मत नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केलं आहे. विविध प्रसारमाध्यमांनी याबाबत वृत्त दिलं आहे.

बहुसंख्य लोकांनी असं मत व्यक्त केलं की, हिंदी भाषा ही पाचवी पासून असायला हरकत नाही. त्याचबरोबर मी तुम्हाला सांगू इच्छितो की, काही लोकांनी आग्रह धरला की हिंदी पहिलीपासून असली पाहिजे. काही लोकांनी असंही मत मांडलं की, हिंदीचं मराठीवर अतिक्रमण होत आहे ते रोखलं पाहिजे. त्यावर काही लोकांनी असंही मत मांडलं की हिंदी महाराष्ट्रातून लोप पावत चालली आहे. आता या सगळ्यांच्या मतांचा आदर राखून आम्ही स्वीकारली आहेत असंही नरेंद्र जाधव म्हणाले